|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

**North Maharashtra University, Jalgaon**

**उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव**

पत्रपेटी क्र. ८०, उमविनगर, जळगाव- ४२५००१

दूरध्वनी क्र. (०२५७) २२५७२४८, २४९, २५३ फॅक्स क्र. २२५८४०३, ४०६

'A' Grade

(NAAC Re-Accredited)

3rd Cycle

## Public Relations Office जनसंपर्क विभाग

**बातमी - 1**

जळगाव 31 ( ) जागतिक तंबाखू विरोधी दिनानिमित्त उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील प्राध्यापक, अधिकारी व कर्मचारी यांनी गुरूवारी तंबाखू विरोधी शपथ घेतली.

विद्यापीठाच्या अधिसभा सभागृहात कुलगुरू प्रा.पी.पी.पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमात डॉ.नरसिंह परदेशी यांनी तंबाखू विरोधी शपथ दिली. यावेळी बोलताना कुलगुरूंनी तंबाखूच्या व्यसनामुळे कुटुंबाची वाताहत होते असे सांगुन व्यसनापासून दूर राहण्याचे आवाहन केले. यावेळी त्यांनी कर्मचाऱ्यांना दुचाकीसाठी हेल्मेट वापरण्याचेही आवाहन केले. यावेळी मंचावर प्र-कुलगुरू प्रा.पी.पी.माहुलीकर उपस्थित होते.

**----xx----**

**बातमी - 2**

जळगाव दि. 31 ( ) उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या सामान्य प्रशासन विभागातील सहायक श्री.राजेंद्र अमृत पाटील यांना सेवाानिवृतीबद्दल आज गुरूवार, दिनांक 31 मे, 2018 रोजी कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील यांच्या अध्यक्षतेखाली निरोप देण्यात आला.

विद्यापीठाच्या अधिसभा सभागृहात झालेल्या या कार्यक्रमात श्री. राजेंद्र पाटील यांनी गेली 22 वर्षे केलेल्या सेवेचा गौरव करण्यात आला. यावेळी प्रा.ए.यु.बोरसे, डॉ.आर.आर.काझी, प्रवीण चंदनकर, शिवाजी पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी श्री. पाटील यांनी सत्काराला उत्तर देतांना सर्वांचे आभार मानले. अध्यक्षीय समारोप कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील यांनी केला. यावेळी श्री. पाटील व त्यांच्या पत्नी सौ. लताबाई पाटील यांचा शाल, स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी व्यासपीठावर प्र-कुलगुरू प्रा.पी.पी.माहुलीकर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जनसंपर्क अधिकारी डॉ.सुनील पाटील यांनी केले. याप्रसंगी विद्यापीठातील शिक्षक, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

---

जा.क्र.उमवि/16/हस्तदेय/2018 दि. 31 मे, 2018

प्रति,
मा. संपादक / प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,

स्वाक्षरीत //--
**(डॉ. सुनील पाटील )**
जनसंपर्क अधिकारी